**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी**

**मी याद्वारे शपथेवर निवेदन करतो की,**

नाव– बालाजी राम जाधव,

वय– ३५ वर्षे,

व्यवसाय– तहसिल कार्यालय,निलंगा,

राहणार– एलआयसी,कॉलनी,लातूर

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सरकारी वकिल श्रीमती एम.आर. कुलकर्णी यांच्या वतीने</u>**

१. दि.११/०३/२०२१ रोजी मी तहसिल कार्यालय, औसा येथे तलाठी म्हणून कार्यरत होतो. त्या दिवशी गोंद्री गावच्या ताब्याच्या प्रकरणाबाबत आम्ही पोलीसांनी पत्र दिल्याने पंचनाम्यासाठी गेलो होतो. आम्ही गट क्र.३८,गोंद्री या गावच्या सतीष भानुदास मंदाडे यांच्या शेतामध्ये गेलो होतो. पोलीसांनी आम्हाला घटनास्थळ दाखविले. त्यावेळी पोलीसांनी आम्हाला दि.१० तारखेला त्या ठिकाणी ताब्याचे प्रकरण होते तेव्हा पोलीसांना काही लोकांनी अडथळा केला होता असे सांगितले. मी घटनास्थळ पाहिले. ते शेत चौकामध्ये होते. तेथे शेतात अर्धवट तारेचे कुंपन केल्याचे दिसले. घटनास्थळच्या पश्चिमेस– गोंद्री मोड ते धानोरा जाणारा रस्ता, दक्षिणेस– गोद्री मोड ते भुसणी जाणारा रस्ता, पूर्वेस – रमेश काळे यांचे शेत व उत्तरेस – निळकंठ शिंदे यांचे शेत होते. त्या ठिकाणी पंचनामा केला. त्यावर मी माझी सही केली. पंचनाम्यावेळी माझा सहकारी उमाकांत यादव होता. आता मला पंचनामा दाखविला. त्यावर अ.क्र.१ ला माझी सही आहे. पंचनाम्यास **<u>नि.क्र.७०/सा.क्र.१</u>** देण्यात येते. घटनास्थळावर आमचे फोटो घेतलेले होते. आता मला पंचनाम्यासोबतचा फोटो दाखविला. त्यामध्ये पांढरी टोपी घातलेला मी आहे.

तसेच दुसरा पंच व पोलीस तेथे हजर आहेत. फोटोला कागदपत्र **<u>अ.क्र.१</u>** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलट तपास आरोपी करिता विधीज्ञ श्री.टी.आर.उफाडे यांच्या वतीने</u>**

२. मी १० वर्षांपासून नोकरी करतो. सन–२०२१ मध्ये औसा तलाठी सज्ञा खुंटेगाव येथे कार्यरत होतो. मी सन–२०२१ पासून खुंटेगाव सज्ञा येथे नोकरीस होतो. खुंटेगाव सज्ञामध्ये तीन गावे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, २०२१ मध्ये मला माझ्या सज्ञावर दररोज जावे लागायचे. हे म्हणणे खरे आहे की, सज्ञा मोठा असल्यामुळे मला सकाळी गेल्यावर संध्याकाळी येण्यास उशिर होत असे. हे म्हणणे खरे आहे की, दि.११/०३/२०२१ रोजी मी माझ्या सज्ञावर गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवशी मी औशाला उशिरा परत आलो होतो.

३. हे म्हणणे खरे आहे की, मला मंडळ अधिकारी हे वरिष्ठ असतात. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सज्ञाचे तहसिल कार्यालय, औसा आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला पत्रव्यवहार करताना पहिला पत्र व्यवहार माझ्या वरिष्ठांकडे जातो. मला आलेले पत्र दि.१०/०३/२०२१ रोजी तहसिल कार्यालयात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, ते पत्र पहिले तहसिलदाराकडे गेले. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, पत्र दि.११/०३/२०२१ रोजी तहसिल कार्यालयात पत्र आले होते. हे म्हणणे खरे आहे की, ते पत्र मंडळ अधिका–यांना किती वाजता मिळाले ते मला सांगता येत नाही.

प्रश्न– दि.११/०३/२०२१ रोजी तुमची मंडळ अधिका–यांशी किती वाजता भेट झाली ते सांगता येईल काय ?

उत्तर–माझी भेट झाली नाही. मला तहसिल कार्यालयातून फोन आला.

४. मला तहसिल कार्यालयातून ३.१५ वाजता फोन आला. मला पत्र आल्यानंतर माझ्या वरिष्ठांचा लेखी आदेश मिळाला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, दि.११ तारखेला माझा मंडळ अधिका–यांशी संपर्क झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला कोणाचा फोन आला हे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला फोन आला त्यावेळी मी खुंटेगाव येथे होतो. खुंटेगाव ते औसा यातील अंतर १० किमी आहे. खुंटेगावहून औसा येथे येण्यासाठी १५ ते २० मिनीटे लागतात. मी खुंटेगाववरून आल्यावर अगोदर तहसिल कार्यालयात गेलो. हे म्हणणे खरे आहे की, मला तहसिल कार्यालयात गेल्यावर चौकशी करण्यास १५ ते २० मिनीटे लागले. मी त्या दिवशी तहसिल कार्यालयातील सेक्शन क्लर्कसोबत चर्चा केली. हे म्हणणे खरे आहे की, मला घटनास्थळावर पंचनाम्याला जाण्यासाठी तहसिलदार किंवा मंडळ अधिकारी यांचा लेखी आदेश नव्हता. हे मला सांगता येणार नाही की, तहसिल कार्यालयामार्फत मला व उमाकांत यादर यांना पंचनाम्यासाठी पाठवित आहोत असा पत्रव्यवहार झालेला नव्हता.

५. त्या दिवशी दुपारी ३.०० वाजता पोलीस तहसिल कार्यालयात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझी व पोलीसांची ११ तारखेला गाठभेट झाली नाही. गोंद्री गाव ते औसा यातील अंतर १७ ते १८ किमी आहे. त्या ठिकाणी गाडीवरून जाण्यास अर्धातास लागतो. गोंद्रीला जाण्यास औसातून सारोळा मार्गे जावे लागते. मी गोंद्रीला सहका–यासोबत गाडीवरून गेलो. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्याला जाण्यासाठी तहसिल कार्यालयातील डायरीवर नोंद करावी लागते. मी तशी नोंद केली नाही. मी तहसिल कार्यालयातून ३.१५ च्या दरम्यान निघालो. हे म्हणणे खरे आहे की, औसा हे रहदारीचे ठिकाण आहे. हे म्हणणे खरे नाही की,औसा चौकामध्ये दररोज वाहनांची गर्दी राहते. हे म्हणणे खरे आहे की, सारोळा मार्गे जाणारा

रस्ता खराब आहे व सावकाश जावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, रस्ता खराब असल्यामुळे गोंद्री गावला जाण्यास पाऊण ते एक तास लागू शकतो.

प्रश्न– तुम्ही औसाहून निघाल्यावर गोंद्री गावात किती वाजता पोहोचलात?

उत्तर–आम्ही गोंद्री गावात गेलो नाही. घटनास्थळ गोंद्री गावाच्या अलीकडेच आहे.

६. आम्ही गट क्र.३८ मध्ये ४.०० चे दरम्यान पोहोचलो. त्या ठिकाणी आमच्या अगोदर पोलीस गेलेले होते. हे म्हणणे खरे नाही की,आम्ही जाण्यापूर्वी त्या ठिकाणी बरेच लोक जमा झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही जाण्यापूर्वीच पोलीस लिखापडी करीत होते.

प्रश्न– घटनास्थळ रोडपासून किती अंतरावर आहे ?

उत्तर–रोडच्या लगतच आहे.

७. आम्ही आजूबाजूंच्या लोकांच्या जमीनी पाहिल्या. मी आजूबाजूला कोणाच्या जमीनी आहेत ते तलाठी म्हणून ७/१२ पाहिला नाही. गट क्र.३८ हा सतिष भानूदास मंदाडे यांच्या नावावर आहे का ते मी ७/१२ वरून पाहिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.३८ हा कोणाच्या मालकीचा आहे हे कागदपत्रावरून पाहिले नाही. गट क्र.३८ वर कोंडीबा शिंदेची कुळ असल्याबाबत कागदपत्रे पाहिले नाहीत. साक्षीदार सांगतो की, कुळ असल्याचे ऐकिव माहिती आहे. सतिष मंदाडे व कोंडीबा शिंदे यांच्यामध्ये कुळाचे वाद असल्याची ऐकिव माहिती आहे.

८. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर ज्याची मालकी होती ते मालक तेथे हजर नव्हते. तेथे तीन पोलीस कर्मचारी होते. त्या पैकी गायकवाड यांचे नाव माहित आहे. ईतरांची नावे माहित नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या समक्ष पंचनामा तयार केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी पंचनाम्याच्या वेळी थांबून परत निघून गेलो. आम्ही त्या ठिकाणी अर्धा तास थांबलो. हे म्हणणे खरे आहे की,त्यानंतर मी औसा येथे गेलो. हे म्हणणे खरे आहे की, मी औसाला गेल्यावर माझी

व पोलीसांची गाठभेट झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्यावर जी सही केली ती गोंद्री गावातून परत आल्यावर पोलीस ठाण्यात बोलावून घेतल्यानंतर केली.

९. हे म्हणणे खरे नाही की, मला पोलीसांनी पंचनाम्यासाठी बोलाविले नव्हते. तसेच मला अधिकार दिले नसताना मी पंचनाम्यासाठी गेलो. हे म्हणणे खरे नाही की, मी सतिष मंदाडे यांच्या गट क्र.३८ मध्ये गेलो होतो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला घटनास्थळ दाखविले व मला त्या ठिकाणी ताब्याचा प्रश्न होता असे सांगितले हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी पोलीसांना शासकीय कामात अडथळा केला होता असे मला सांगितले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी मला तारेचे कुंपन अर्धवट केल्याचे दिसले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी गट क्र.३८ च्या चतूःसिमा खोटया सांगितल्या. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी फोटो काढले व ते फोटो माझे आहेत हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पीएसआय गायकवाड व माझ्या वरिष्ठांच्या सांगण्यावरून मी आज खोटी साक्ष दिली.

**उलट तपास पूर्ण.**

**सरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत केले.

Digitally signed by PADMAKAR PRABHAKAR KESTIKAR
Date: 2025.11.15 15:17:37 +0530

(पी.पी.केस्तीकर)

दि.१५/११/२०२५

अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
लातूर